राहाता येथील पंकज रा. फुलारी, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, राहाता यांचे न्यायालयात.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १००/२०२५ निशाणी क्र. १४

१. गुन्हा घडल्याची तारीख - ०४.०१.२०२५ चे पंधरा दिवस नंतर

२. फिर्याद दाखल तारीख - २८.०१.२०२५

३. फिर्यादीचे नाव - नगर अर्बन मल्टीपल निधी लि. कोल्हार, ता. राहाता करिता शाखाधिकारी विशाल बाळासाहेब वडितके, वय- २१, व्यवसाय – नोकरी, रा. पिंपळगाव फुणगी, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

४. आरोपीचे नाव - मोहन विठ्ठलराव सुकरे, वय- ३३, व्यवसाय – व्यवसाय रा. पिंपळगाव, सय्यदमियॉ, ता. जि. परभणी.

५. गुन्हयाचे तपशील खालीलप्रमाणे आहेः

तुम्ही कर्ज किंव अन्य देणे पुर्णतः अथवा अंशतः फेडणेसाठी फिर्यादी यांचे नावाने दिलेला आय.डी.बी.आय. बँक, शाखा कोल्हार ह्या बँकेचा दिनांक ०५.१२.२०२४ रोजीचा धनादेश क्र.११६५५९ चा रक्कम रु.३७,६४६/- चा धनादेश वटण्याकरिता दिला असता सदर धनादेश तुमचे खाते असलेल्या बँकेकडुन 'Drawer Signature Differ' ह्या कारणामुळे न वटता परत आला व त्यानंतर त्या धनादेशाचे रकमेची मागणी करणेसाठी वरील फिर्यादीने तुम्हास पाठविलेली दिनांक ३१.१२.२०२४ रोजीची नोटीस दिनांक ०४.०१.२०२५ रोजी तुम्ही स्वीकारल्या नंतरही १५ दिवसांत सदर धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिली नाही आणि त्यामुळे कलम १३८, परक्राम्य लेख अधिनियम अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला असुन मी गुन्ह्याची दखल घेतली आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देश देतो की, तुमची उपरोक्त आरोपाकरीता ह्या न्यायालयाद्वारे न्याय चौकशी करणेत यावी.

आरोपीचे प्रतिकथनः-

प्रश्न क्र. १. तुम्हाला केस पेपरच्या प्रती मिळाल्या आहेत का?
उत्तर होय.

प्रश्न क्र. २. दोषारोपातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हाला वाचुन व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हास समजला काय?
उत्तर होय.

प्रश्न क्र. ३. सदरचा गुन्हा तुम्हास कबुल आहे का?
उत्तर नाही.

समक्ष,

आरोपीची सही

सही/-
**(पंकज रा. फुलारी)**
न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

गुन्हयाचा तपशील आरोपींना त्यांचे मातृभाषेत वाचुन दाखविणेत आला व समजावुन सांगणेत आला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. आरोपींचे म्हणणे स्वतंत्ररित्या नोंदविणेत आले आहे.

सही/-
**(पंकज रा. फुलारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

दिनांक : २८.११.२०२५
ठिकाण : राहाता